# अभीप्सा

अखिल भारतीय पत्रिका
एप्रिल २०२६
वर्ष ५१ अंक ०४



## सूर्यप्रकाशित मार्ग

# सूर्यप्रकाशित मार्ग

संपादकीय..............................................................०२
सूर्यप्रकाशित मार्ग.......................................................०३
प्रसन्नता...............................................................२४
अडीअडचणी आणि सूर्यप्रकाशित मार्ग...............................२७

---

## संपादकीय

योगाचे जे विविध मार्ग आहेत त्यांचे प्रामुख्याने दोन मुख्य प्रकारात वर्गीकरण करता येते. एक प्रकार म्हणजे कष्टप्रद मार्ग. तपस्येवर आधारित मार्गांची गणना या वर्गात होते. पण आणखी एक मार्गही असतो. तो मार्ग असतो सूर्यप्रकाशित मार्ग. या मार्गामध्ये ईश्वरावरील श्रद्धा, विश्वास, श्रीमाताजींप्रति खुले असणे, उत्कट व सातत्यपूर्ण अभीप्सा बाळगणे या गोष्टी महत्त्वाच्या असतात. येथे साधकामध्ये ईश्वरी शक्ती कार्य करत असल्यामुळे हा मार्ग तुलनेने अधिक सोपा असतो. साधकाला या मार्गावर वाटचाल करताना अडचणी आल्या तर तो त्या अडचणींनाही हसतमुखाने सामोरे जातो. साधकांनी या मार्गाचा अवलंब करावा असे श्रीअरविंद व श्रीमाताजी यांचे सांगणे आहे. 'अभीप्सा' मासिकाचा हा अंक 'सूर्यप्रकाशित मार्ग' या विषयास वाहिलेला आहे.

संपादक, अभीप्सा मासिक

**

---

अभीप्सा मासिक हे श्रीअरविंद सोसायटी, पाँडिचेरीचे मुखपत्र आहे.
अभीप्सा मासिक म्हणजे All India Magazine ची मराठी आवृत्ती आहे.

---

योगी श्रीअरविंद म्हणजे पूर्वाश्रमीचे क्रांतिकारक अरविंद घोष आणि श्रीमाताजी म्हणजे पूर्वाश्रमीच्या मीरा अल्फासा, (फ्रान्स). 'श्रीअरविंद आश्रम' हा भारताच्या पूर्व किनाऱ्यावर पाँडिचेरी येथे आहे.

# सूर्यप्रकाशित मार्ग

## दिव्य मातेची कृपा

जीवनामध्ये सर्व प्रकारचे भय, धोके आणि संकट यांच्यासमोर सुरक्षित कवच परिधान करून, निर्भयपणे वाटचाल करायची असेल तर 'श्रद्धा, प्रामाणिकपणा व समर्पण यांनी युक्त अशी तुमची आंतरिक स्थिती' आणि 'दिव्य मातेची कृपा' या दोन गोष्टी आवश्यक असतात. आणि या दोन्ही गोष्टी नेहमीच हातात हात घालून असतात. त्यासाठी तुमची श्रद्धा ही विशुद्ध, विनम्र आणि परिपूर्ण असली पाहिजे.

मनोमय आणि प्राणमय पुरुषामध्ये असलेली अहंमन्य श्रद्धा ही एखाद्या छोट्याशा ज्योतीसारखी असते. महत्त्वाकांक्षा, अभिमान, घमेंड, मानसिक उद्धटपणा, स्वतःच्या प्राणिक इच्छा, वैयक्तिक मागणी, छोट्याछोट्या गोष्टींमधून समाधान मिळविण्याची कनिष्ठ प्रकृतीची कामना या साऱ्यांनी ती श्रद्धा कलंकित झालेली आणि जणू धुराने काजळलेली अशी असते. स्वर्गाप्रत जाईपर्यंत ही ज्योत तेवत राहू शकत नाही.

तुम्हाला तुमचे जीवन दिव्य कार्यासाठी आणि दिव्य आविष्करणामध्ये साहाय्यभूत होण्यासाठी देण्यात आले आहे, या दृष्टिकोनातून जीवनाकडे पाहा. पावित्र्य, शक्ती, प्रकाश, विशालता, स्थिरता, दिव्य चेतनेचा आनंद आणि तुमचे मन, प्राण व शरीर यांचे परिपूर्ण रूपांतरण करण्याचा आणि त्यांना परिपूर्ण करण्याचा दिव्य चेतनेचा संकल्प यांशिवाय इतर कोणत्याच गोष्टीची अभिलाषा बाळगू नका. दिव्य, आध्यात्मिक आणि अतिमानसिक सत्य, त्या सत्याचा पृथ्वीतलावर, तसेच तुमच्यामध्ये आणि जे कोणी ईश्वरी कार्यासाठी नियोजित असतील अशा सर्वांमध्ये होणारा साक्षात्कार, तसेच या सत्याच्या निर्मितीसाठी योग्य अशी परिस्थिती आणि शेवटी सर्व विरोधी शक्तींवर या सत्याचा संपूर्ण विजय या व यांसारख्या गोष्टींव्यतिरिक्त अन्य कशाचीही मागणी करू नका. तुमचा प्रामाणिकपणा आणि समर्पण शुद्ध व समग्र असले पाहिजे.

तुम्ही जेव्हा आत्मदान कराल, तेव्हा ते संपूर्ण, निरपेक्ष, विनाअट, हातचे काहीही राखून न ठेवता करा; म्हणजे मग तुमच्यामधील सारेकाही त्या दिव्य मातेचे होईल; आणि तेव्हा तुमच्या अस्तित्वाचा एकही अंश अहंकाराच्या किंवा एखाद्या असत्–शक्तीच्या आहारी जाणार नाही. तुमची श्रद्धा, तुमचा प्रामाणिकपणा आणि तुमचे समर्पण हे जेवढे अधिक परिपूर्ण असेल तेवढ्या अधिक प्रमाणात कृपा व संरक्षण तुमच्यासोबत असेल.

दिव्य मातेचे संरक्षण आणि तिची कृपा तुमच्यासोबत असताना, तुमच्या वाटेला जाण्याची हिंमत कोण करू धजावेल? तुम्हाला कोणाची भीती बाळगण्याची गरजच काय? तिच्या कृपेचा आणि संरक्षणाचा थोडासा अंशदेखील तुम्हाला सर्व अडीअडचणी, अडथळे आणि धोके यांमधून पार करू शकतो; तर मग, तिने पूर्णतयाच तुम्हाला कवळून घेतले तर, कोणतीही विरोधी शक्ती, मग ती कितीही बलवान का असेना, ती या जगातील असो किंवा इतर अदृश्य जगतांमधील असो, तिची बाधा न पोहोचता, सर्व संकटांपासून मुक्त होऊन, तुम्ही तुमच्या मार्गावरून पूर्ण सुरक्षितपणे वाटचाल करू शकता; कारण तो मार्ग हा दिव्य मातेचा मार्ग असतो. तिच्या स्पर्शामुळे अडचणींचे संधींमध्ये, अपयशाचे यशामध्ये आणि दुर्बलतेचे अविचल सामर्थ्यामध्ये परिवर्तन होते.

दिव्य मातेची कृपा ही परमेश्वराची मोहोर असते आणि आज ना उद्या तिचा परिणाम झाल्याखेरीज राहत नाही. ती निर्धारित केलेली, एक अटळ, दुर्दम्य अशी गोष्ट असते.

– श्रीअरविंद (CWSA 32 : 08-09)

*

## आपल्या अंतरंगातील देवता

आपले आवेग आणि आपल्या वासना, आपली पीडा आणि आपली आक्रमकता, आपले दु:खभोग आणि आपले संघर्ष, या आपल्या आंतरिक चढउतारांची आपल्या अनिर्बंध कल्पनेने रंगविलेली नाट्यमय चित्रे यांची

किंमत ती काय? अंतरंगांत खोलवर अंतरतम प्रदेशात राहून आपल्या अस्तित्वावर कृपाछत्र धरणाऱ्या, आपले दौर्बल्य सहन करणाऱ्या, आपले प्रमाद सुधारणाऱ्या, आपल्या जखमा भरून काढून, आपल्या संपूर्ण अस्तित्वास नवजीवनदायी तुषारांनी न्हाऊ घालणाऱ्या महान उदात्त, दिव्य प्रेमासमोर त्यांची किंमत ती काय?

आपल्या अंतरंगातील देवता कधीही सक्ती करत नाही. ती कोणतीही मागणी करत नाही किंवा भयदेखील दाखवीत नाही; ती स्वतःच आत्मदान करते. वस्तुजात आणि प्राणिमात्र यांच्या हृदयांमध्ये ती दडून बसते; आणि ती स्वतःचेच विस्मरण करविते. ती कोणाला दोष देत नाही, की गुणदोषांचे मोजमाप करत बसत नाही. कोणास शाप देत नाही की कोणाची निंदाही करत नाही. तर ती पूर्णत्व आणण्याचे कार्य कोणत्याही प्रतिबंधाविना अथकपणे करत राहते; कानउघडणी न करता सुधारणा घडवून आणण्याचे, उतावीळपणा न करता प्रोत्साहित करत राहण्याचे कार्य अथकपणे करत राहते. प्रत्येक व्यक्तीच्या ग्रहणशीलतेनुसार प्रत्येकाला समृद्ध करण्यासाठी ती अथकपणे झटत राहते.

ती माऊली आहे. तिच्या प्रेमरूपी फळांकरवी ती भरणपोषण करते; ती सांभाळ करते आणि रक्षण करते; सल्ला देते व सांत्वन करते; कारण ती सर्वकाही जाणते, ती सर्वकाही सहन करू शकते, ती सर्वांच्या चुका पदरात घेते व क्षमा करते; सर्वांविषयी आशा बाळगते आणि सर्वांना सर्व गोष्टींसाठी सुसज्ज करते.

तिने सर्वकाही तिच्या स्वतःमध्येच धारण केलेले असल्यामुळे, तिच्या मालकीची असणारी प्रत्येक गोष्ट सर्वांनाच प्राप्त होऊ शकते. ती सर्वांची सेवा करत असल्यामुळे तिचा सर्वांवर प्रेमाधिकार चालतो. याच कारणासाठी लहान अथवा थोर, जे कोणी तिच्याप्रमाणे सत्ताधिकार मिळविण्याची किंवा तिच्यासारखे देवपद मिळविण्याची इच्छा बाळगतात, ते तिच्याप्रमाणे सर्व बांधवांचे सेवक बनून जातात; ते जुलमी सत्ताधीश

बनत नाहीत.

सेवकाची ही विनम्र भूमिका खरोखर किती सुंदर आहे! सर्वांच्या अंतर्यामी असलेल्या ईश्वराचे संदेशदूत होणे आणि सर्व वस्तुंना जीवन देणाऱ्या दिव्य प्रेमाची अभिव्यक्ती करणे हे ज्यांचे जीवितकार्य आहे त्या सर्वांचीच अशा प्रकारची सेवकाची भूमिका असते.

– श्रीमाताजी (CWM 02 : 42-43)

*

## सूर्यप्रकाशित मार्ग कोणासाठी?

प्रथम केंद्रवती समर्पण आणि नंतर अस्तित्वाच्या सर्व घटकांमध्ये अधिक समग्र आत्मदान, अशा प्रकारे जे साधक समर्पणाचे आचरण करू शकतात, त्यांना सूर्यप्रकाशित मार्गाचे अनुसरण करणे शक्य असते. जर ते केंद्रवर्ती समर्पणाचा दृष्टिकोन साध्य करू शकले आणि तो दृष्टिकोन जर ते टिकवून ठेवू शकले, जर ते पूर्णतः ईश्वरावर विसंबून राहू शकले आणि ईश्वराकडून त्यांना जे काही प्राप्त होते त्याचा ते प्रसन्नतेने स्वीकार करू शकले तर, अशा साधकांचा मार्ग सूर्यप्रकाशित होतो आणि तो मार्ग साधासरळ आणि सुकर होतो.

पण म्हणून त्यांची अडचणींपासून सुटका होईलच असे नाही; कोणत्याच साधकाची तशी ती होत नाही; पण त्या अडचणींना सामोरे जाताना ते दुःखीकष्टी किंवा निराश होत नाहीत. भगवद्गीतेत सांगितले आहे त्याप्रमाणे योगसाधना ही 'अनिर्विण्णचेतसा' (विषण्णता मनाला शिवू न देता), आंतरिक मार्गदर्शनावर विश्वास ठेवून आणि अधिकाधिक बोध करून घेत आचरली पाहिजे, अन्यथा गुरूच्या मार्गदर्शनाने आचरली पाहिजे. व्यक्तीला अंतरंगामध्ये कोणताही प्रकाश किंवा कोणतेही मार्गदर्शन जाणवत नसताना देखील, जर त्या व्यक्तीकडे सुस्थिर तेजस्वी श्रद्धा व आनंददायी भक्ती असेल किंवा तशी श्रद्धा व भक्ती ती व्यक्ती प्राप्त करून घेऊ शकत असेल; किंवा जर व्यक्ती आध्यात्मिक आशावादी

प्रवृत्तीची असेल आणि 'जरी आपल्याला ईश्वराच्या कृतीचे आकलन होऊ शकले नाही तरी ईश्वर जे काही करतो ते आपल्या भल्यासाठीच करतो,' अशी जर त्या व्यक्तीची ठाम भावना किंवा विश्वास असेल तर अशी व्यक्तीदेखील या मार्गाचे अनुसरण करू शकते.

परंतु सर्वांची प्रकृती काही तशी असत नाही, बहुतांश जण या पासून खूप दूर असतात आणि त्यामुळे समग्र काय किंवा अगदी केंद्रवर्ती समर्पण काय, ते साध्य करणे ही गोष्ट सोपी नसते आणि ते समर्पण नेहमी तसेच कायम टिकवणे हेसुद्धा आपल्या मानवी प्रकृतीला पुष्कळच कठीण असते. जेव्हा या गोष्टी व्यक्तीमध्ये नसतात तेव्हा, आत्म्याची मुक्ती साध्य होईपर्यंत आपल्याला प्रकृतीच्या कायद्यानुसार वागणे भागच पडते किंवा मग अतिशय कठीण, उग्र तपस्या करावी लागते.

हा कायदा आपल्यावर अज्ञानाद्‌वारे लादला गेलेला असतो; आपल्या घटकांची ती प्रकृती असते. आपले शारीर अस्तित्व हे अज्ञानाचा एक ढीग असल्यासारखे असते. प्राणिक अस्तित्व हे अज्ञानी इच्छावासना आणि आवेग यांनी भरलेले असते. मन हे सुद्धा अज्ञानाचेच साधन असते. मन हे त्याच्यापाशी असलेले बाह्य, अपूर्ण, बहुतांशी वेळेला कनिष्ठ प्रतीचे असलेले ज्ञान टिकवून ठेवण्यासाठी धडपडत असते. साधकाचा मार्ग या अशा अज्ञानामधूनच जात असतो. बऱ्याच दीर्घ काळपर्यंत त्याला ठोस अनुभूतीचा किंवा साक्षात्काराचा प्रकाश दिसत नाही. मनाच्या काही कल्पना, आशा, विश्वास या गोष्टी मार्गावर आढळतात, पण त्या गोष्टी त्याला खऱ्या आध्यात्मिक दर्शनाचा अनुभव देऊ शकत नाहीत. क्वचित कधीकधी त्याला त्या प्रकाशाची झलक पाहायला मिळते, पण तो प्रकाश लवकरच मावळून जातो. कधीकधी प्रकाशाचे काही कालावधीसुद्धा येतात. पण या तेजोमय कालावधीच्या पाठोपाठ अंधकाराचे वारंवार येणारे किंवा दीर्घ कालावधीसुद्धा असतात. या मार्गावर सतत चढउतार चालू असतात, वारंवार अपेक्षाभंग वाट्याला येतो, असंख्य वेळेला अपयश पदरी पडते,

नमस्कार वाचकहो,

अभीप्सा मासिकातील काही पाने आपल्या अवलोकनार्थ येथे देण्यात आली होती. आपल्याला ह्या अंकातील विषयावरील आणि यासारख्या इतर विषयांवरील श्रीअरविंद आणि श्रीमाताजी यांचे विचार मराठीत समजून घ्यावयाचे असतील तर, आपण अभीप्सा मासिकाचे वर्गणीदार व्हावे, ही विनंती.

वर्गणीचा तपशील शेजारील पानावर दिला आहे.

– संपादक, अभीप्सा मासिक

## मासिकाचे स्वरूप

श्रीअरविंदांचे बहुतांशी सारे साहित्य मुळात इंग्रजी व बंगाली भाषेत आहे. तर श्रीमाताजी यांचे बहुतांशी वाङ्मय फ्रेंच व इंग्रजी भाषेत आहे. हे दुर्मिळ विचारधन मराठीत आणण्याचे प्रयत्न 'अभीप्सा' या मासिकाच्या माध्यमातून अव्याहतपणे चालू आहेत. पाँडिचेरीहून प्रकाशित होणाऱ्या श्रीअरविंद सोसायटीचे मुखपत्र असलेल्या 'ऑल इंडिया मॅगेझिन' या इंग्रजी मासिकाची मराठी आवृत्ती म्हणजे 'अभीप्सा.' १९७५ पासून हे मासिक नियमितपणे प्रकाशित होत आहे.

### वर्गणी व देणगीचा तपशील

वार्षिक वर्गणी : २०० रू. (१२ अंक)
तीन वर्षाचे दर : ५८० रू. (३६ अंक)
पाच वर्षांचे दर : ९६० रू. (६० अंक)
देणगीदार : ४००० रू.
(देणग्या 80 G अंतर्गत करसवलतीस पात्र आहेत.)

वर्गणी वा देणगीची रक्कम आपण ऑनलाईनदेखील भरू शकता.

### वर्गणी वा देणगी ऑनलाईन भरण्यासाठी बँकेचा तपशील

खातेदाराचे नाव : Sri Aurobindo Society
बँकेचे नाव : Central Bank of India, Pondicherry Branch
IFSC Code : CBIN0281354
A/C No. : 1235467709

*

**सूचना :** रक्कम भरल्याची पोहोचपावती व आपला संपूर्ण पत्ता membership@aurosociety.org आणि editorabhipsa2018@gmail.com या ईमेल आयडीवर पाठवावा ही विनंती; म्हणजे आपल्या पत्त्यावर अंक पाठवता येईल.

*

वर्गणीदारांना काही कारणाने अंक उपलब्ध न झाल्यास पुढील क्रमांकावर संपर्क करावा – श्री. गोविंद पोतदार ९३७३७२४५२०

## आजवर दर्शनदिनी देण्यात आलेले संदेश (क्रमशः)

### १५ ऑगस्ट २००९

हे ईश्वरा, तुझा शोध कसा घ्यावा आणि तुझी सेवा कशी करावी हे सांगण्यासाठी श्रीअरविंद या भूतलावर आले. त्यांनी आम्हाला जी शिकवण दिली आहे ती आम्हाला खऱ्या अर्थाने समजावी आणि पूर्ण प्रामाणिकपणे आम्हाला ती प्रत्यक्षात उतरवता यावी, असे वरदान त्यांच्या जन्मशताब्दी वर्षामध्ये आम्हाला दे.

– श्रीमाताजी (CWM 13 : 15)

*

### १७ नोव्हेंबर २००९

पूर्णयोगाच्या मार्गावरून वाटचाल करण्यासाठी तुमच्यामध्ये निर्भय शौर्य असणे आवश्यक आहे. तुम्ही भीतीच्या क्षुल्लक, दुर्बल आणि कुरूप स्पंदनामुळे पूर्णयोगाच्या या मार्गाकडे कधीही पाठ फिरविता कामा नये. तुमच्यापाशी दुर्दम्य धैर्य, परिपूर्ण प्रामाणिकपणा असला पाहिजे. तुम्ही कोणताही विकल्प उपयोगात न आणता किंवा सौदेबाजी न करता संपूर्ण आत्मदान केले पाहिजे. अर्पण करताना त्याच्या मोबदल्यात काहीतरी मिळावे अशी अपेक्षा तुम्ही बाळगता कामा नये. तुम्ही केलेले अर्पण स्वतःच्या संरक्षणाच्या हेतुने केलेले असता कामा नये. तुमच्या श्रद्धेला पुराव्याची आवश्यकता भासता कामा नये. पूर्णयोगाच्या मार्गावर प्रगत व्हायचे असेल तर या सर्व गोष्टी अनिवार्य असतात; कारण या गोष्टीच तुम्हाला सर्व संकटांमध्ये आश्रय देतात.

– श्रीमाताजी (CWM 15 : 190)

*

# सूर्यप्रकाशित चित्रांमधील आनंद

श्रीअरविंद–आश्रमात धनवंती नावाच्या एक चित्रकार साधिका होत्या. एकदा धनवंती आपली पेंटिंग्ज श्रीमाताजींना दाखवायला घेऊन गेल्या होत्या. बराच वेळ ती चित्रं निरखल्यानंतर, धनवंती यांच्या डोक्यावर हात ठेवत श्रीमाताजी म्हणाल्या, ''बेटा, तुझ्या इथे काहीतरी आहे, पण ती गोष्ट डोक्याकडून हातांपर्यंत जाताना, त्यातील काहीतरी हरवून जाते. तेव्हा तू तुझ्या बोटांकडे लक्ष पुरविले पाहिजे.''असे म्हणून श्रीमाताजींनी धनवंती यांचे हात हातात घेतले आणि त्यांनी धनवंती यांच्या हातांमध्ये आवश्यक ती शक्ती ओतली. त्यानंतर मग धनवंती यांना त्यांचे आंतरिक अनुभव चित्रांमधून अधिक यथातथ्यपणे आविष्कृत करता येऊ लागले, असे त्या सांगतात.

एकदा त्यांची चित्रे पाहून एक तरुण व्यक्ती त्यांना म्हणाली, ''ताई, तुम्ही आश्रमाच्या संरक्षित वातावरणात राहता, बाहेरच्या जगाच्या दुःखदारिद्र्याचा तुम्हाला काही अनुभवच नाहीये आणि म्हणूनच तुमच्या चित्रात इतक्या हसत्या–खेळत्या बागडणाऱ्या व्यक्तिरेखा दिसतात.''

धनवंती यांनी उत्तर दिले, ''माझ्याही जीवनात संघर्ष आहे, जीवनातील एकंदर संघर्षाचीही मला पूर्ण कल्पना आहे. पण तोच संघर्ष मी चित्रांमध्येही दाखवावा आणि लोकांच्या आधीच दुःखीकष्टी असलेल्या जीवनात मी अधिक भर घालावी अशी तुमची इच्छा आहे का? मला माझ्या चित्रांद्वारे त्यांच्या दुःखीकष्टी जीवनावर आनंदाचा शिडकावा करायचा आहे. तुम्हाला माझ्या चित्रांमध्ये हसत्याबागडत्या व्यक्तिरेखा दिसत आहेत खऱ्या, पण त्या देखील खूप दुष्कर प्रवास करून आल्या आहेत. मात्र तो प्रवास मी तुम्हाला दाखवू इच्छित नाही, तर पर्वतशिखरावर पोहोचल्यावर जो आनंद मिळतो तो मी चित्रामधून देऊ इच्छिते. मी आनंद वाटू इच्छिते.''

सूर्यप्रकाशित मार्गावरून वाटचाल करणाऱ्या धनवंती इतरांनाही त्या मार्गाचा अनुभव देण्यासाठी कशा प्रयत्नशील होत्या, हेच या उदाहरणातून दिसून येते.

(आधारित – धनवंती यांच्यावरील स्मृती–लेखामधून, ले. अनुराग बॅनर्जी)

*